NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधी यांची बुनियादी [मुलोद्योगी ] शिक्षणाची संकल्पना

**प्रा. सौ. उज्ज्वला अर्जुनराव देसाई , मराठी विभागप्रमुख, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव, जिल्हा सांगली.**

……………………………………………………………………………………………...

**उद्दिष्ट्ये** :

१) म.गांधी यांची शिक्षण विषयक भूमिका स्पष्ट करणे.
२) म. गांधी यांच्या बुनियादी शिक्षण पद्धतीची संकल्पना स्पष्ट करणे.
३) शैक्षणिक उद्दिष्टांची वैशिष्टे अभ्यासणे
४) शिक्षण पद्धतीची वैशिष्टे अभ्यासणे
५) वर्तमानकाळात गांधीजींच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध विषयासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधनपद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**प्रास्ताविक** :

राष्ट्रपिता म. गांधी हे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे महानायक होत. सत्य. अहिंसा, सदाचार, सहिष्णुता , सहकार्य आणि समता, बंधुता , न्याय या मानवीमुल्यांची जोपासणा करणारे थोर तत्वज्ञ असणाऱ्या म. गांधीनी मुलभूत आणि क्रांतिकारक विचाराने आणि प्रयोगाने साऱ्या जगाला आकर्षित केले. म गांधीनी भारताच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रावरती आपल्या कर्तुत्वाचा अढळ ठसा उमटवला आहे. अशा गांधीजींच्या जीवनविषयक तत्वज्ञानाचे व्यावहारिक स्वरूप म्हणजे त्यांचे शिक्षण विषयक विचार होत.

म. गांधीजी दक्षिण आफ्रिकेत असतानाच 'फिनिक्स' आणि 'टोलस्टोय' आश्रमातील मुलांची त्यांच्यावर नकळत जबाबदारी पडली होती. मुलांच्या शिक्षणाचा गांभीर्याने विचार करायला त्यांनी सुरुवात केली होती. मुलांच्या व्यक्तिमत्वाचा संपूर्ण विकास साधणारे शिक्षण त्यांना हवे होते. गांधीजी भारतात परत आले, तेव्हा त्यांना लॉर्ड मेकॉले च्या शिक्षण पद्धतीतील दोष दिसू लागले. कारकून निर्माण करणारी शिक्षण पद्धती त्यांना मान्य नव्हती. त्यांच्या मते स्वतंत्र भारतासाठी शिक्षण सुद्धा स्वतंत्र हवे. भारताचे प्रश्न काय आहेत, गरजा काय आहेत याचा विचार करून त्यावर मात करता येईल अशी शिक्षणपद्धती त्यांना हवी होती. जी भारतीय संस्कृतीवर आधारित आणि परिपूर्ण भारतीय नागरिक घडवणारी असेल. त्यासाठी त्यांनी हरिजन साप्नहीकामधून लेखन करायला सुरुवात केली होती. पुढे 1937 सली जमनालाल बजाज यांच्या पुढाकाराने जाकीर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली वर्धा येथे शिक्षण परिषद बोलावली. या परिषदेस आचार्य काकासाहेब कालेलकर, आचार्य विनोबा भावे, जगतराम देवीप्रसाद असे शिक्षण तज्ज्ञ उपस्थित होते. म. गांधी यांच्या उपस्थितीत ही परिषद भरली होती. या शिक्षणपद्धतीला वर्धा शिक्षण, जीवन शिक्षण किंवा बुनियादी शिक्षण किंवा नवी तालीम इत्यादी नावांनी ओळखले जाते. यानंतर यापुढे गांधीजींनी यांच्या अध्यक्षतेखाली हरिपुरा येथे भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात गांधीजींनी आपले शिक्षण विषयक विचार मांडले. ते म्हणतात " मी आज देशासमोर आणि संपूर्ण विश्वास समोर काही नवे विचार मांडण्याचा दावा करत आहे आज पर्यंत जायचा विचार यांची देणगी जगाच्या चरणी अर्पण केले आहे त्यापैकी सर्वाधिक क्रांतिकारी आणि महत्त्वपूर्ण असा विचार आहे. याहून अधिक मूल्यवान व महत्त्वाची दुसरी देणगी मी जगासमोर ठेऊ शकेल असे वाटत नाही. या विचारांमध्ये माझ्या साऱ्या रचनात्मक कार्यक्रमांना व्यवहारिक मूर्तरूप देण्याची क्षमता सामावलेली आहे. ही माझी अखेरची सर्वोत्तम जगाला भेट आहे. या भेटीचे नाव आहे 'नयी तालीम' म्हणजेच दुसरे नवे शिक्षण"

**महात्मा गांधींचे शिक्षण विषयक विचार**

महात्मा गांधीजींनी मांडलेले शिक्षण विषयक विचार हे अत्यंत कृतिशील, व्यवहारी आणि जीवनाभिमुख आहे. त्यामध्ये त्यांनी व्यक्तीच्या बुद्धी, कल्पना आणि सर्जनशीलतेला वाव दिला आहे. त्यांच्यामते केवळ साक्षर होणे म्हणजे शिक्षण नव्हे; तर व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास साधणे म्हणजे शिक्षण. शिक्षणातून माणूस घडला पाहिजे

व त्यातून समाजपरिवर्तनही झाले पाहिजे. असे झाले तरच भारतात वर्णहीन, शोषणरहित, समता व बंधुतेवर आधारलेले रामराज्य निर्माण होईल.

**मुलो्दयोगी शिक्षणाची वैशिष्ट्ये**

१. मन, बुद्धी, शरीर यांच्या संतुलित आणि सुसंवादीत्व साधणारी जीवनकेंद्री शिक्षण पद्धती.
२. सदगुणांचा सर्वोत्रय विकास व जबाबदार नागरिकत्वाची जडणघडण यावर भर देणे.
३. बालकांच्या नैसर्गिक कृतिशील प्रेरणाचा विचार करणे.
४. जीवनोपयोगी हस्तोद्योगास केंद्रस्थानी ठेवत विविध विषयांच्या क्षमतांचा समन्वय साधत शिकणे यात अभिप्रेत आहे.
५. मातृभाषेतून शिक्षण देणे तो मुलांचे अधिकार आहे.
६. शारीरिक काम आणि कौशल्ये यांचा शास्त्रीय ज्ञानाशी समन्वय घडवून परिश्रम आणि परिश्रमी दोघांनाही ज्ञान व्यवस्थेत सन्मानाचे स्थान देणे.
७. कला संगीत खेळ व्यायाम यांना यात स्थान आहे.
८. सर्वांना सक्तीचे आणि समान दर्जाचे शिक्षण देणे.
९. वैज्ञानिक दृष्टीकोण वाढवणे याबरोबरच गणित, भूगोल, इतिहास, समाजशास्त्रे शिकविण्याची व्यवस्था करणे.
१०. मुलांच्या चारित्र्याची जडणघडण करणे.
११. ७ ते १४ वयोगटातील मुलामुलींना शिक्षण मोफत व सक्तीचे करणे.

**मुलोद्योगी शिक्षण पद्धतीची उद्दिष्टे**

१ लोकशाही शासनपद्धतीमध्ये सुजान नागरिकाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. शाळा महाविद्यालायांमधून विद्यार्थ्यांना आदर्श नागरिकत्वाचे धडे मिळावेत.
२ आर्थिक स्वावलंबनातून विद्यार्थी व संस्था यांचा विकास होईल आणि उदरनिर्वाहाची गरज वस्तू विक्रीच्या पैशातून भागवली जाईल.
३ श्रमाला महत्व देणारी निर्दोष सर्वोदयी समाज जो त्याग, सहकार्य, प्रेम, सेवाभाव आणि आत्मविश्वास या गुणांनी युक्त व वाईट दुष्प्रवृत्ती पासून मुक्त असेल.
४ आजूबाजूच्या परिस्थितीशी, परिसराची आणि जीवनाशी समन्वय साधणारे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकविणे.
५ आदर्शवाद, निसर्गवाद, कार्यवाद यांचा समन्वय शिक्षणात घडविणे. पुस्तकी ज्ञानापेक्षा कृतीद्वारे ज्ञान, शिक्षण विद्यार्थ्यांना देऊन त्यांचा सर्वांगीण, समतोल विकास साधणे.

**मुलोद्योगी शिक्षणाची अध्यापनपद्धती**

१. कृती द्वारे शिक्षण - गांधीजींच्या मते खरे बौद्धिक शिक्षण हे शरीराच्या हात, पाय, डोळे, नाक इ. अवयवांच्या योग्य वापरातून होते. त्यांच्या सर्वांगीण क्षमतांचा विकास करणारी बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक व भावनिक विकास करणारे असावे.
२. स्वानुभवातून शिक्षण- बालक जेवढे अधिक अनुभव घेत जाईल तेवढे त्याचे ज्ञान अधिक व्यापक होत जाईल. म्हणून जीवनाशी निगडीत असे अनुभव देऊन अनुभवाद्वारे शिक्षण दिले जावे.
३. आंतर विद्याशास्त्रीय शिक्षण- अनेक विषयांकडे पाहण्याची सौंदर्यदृष्टी विकसित करणे. जीवनोपयोगी सर्व विषयक्षेत्रांचा समावेश असणारे शिक्षण विद्यार्थ्यांना देणे.
४. ज्ञान हे निरीक्षण, अनुभव आणि कृती यावर आधारित असावे.
५. शिक्षकांसाठी मुलोद्योग प्रशिक्षण संस्था आणि पर्यवेक्षक प्रशिक्षण संस्था सुरु करुन त्यांना प्रशिक्षण देणे. केंद्रीय शिक्षण सल्लागार समितीने मूलोद्योग शिक्षणाचे मूल्यमापन करण्यासाठी समिती नेमणे.

गांधींचा मूलोद्योग शिक्षणविषयकदृष्टीकोन आशय आणि पद्धती ही भारतातील सामान्य माणसाच्या गरजांशी सुसंवादी होत्या. हि पद्धती विद्यार्थ्यांना स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा, शिकवणारी त्यांना स्वयंपूर्ण, कृतीशील, सृजनशील

व्यवसायाभिमुख बनविणारी त्यांचा आत्मविश्वास घडवून त्यांना चारीत्र्यसंपन्न बनविणारी धार्मिक सहिष्णुता, सामाजिक उत्तरदायित्व, स्वातंत्र्यतेच्या भावनेचा विकास करून राष्ट्रहित जोपासणारी होती. १९३८ मध्ये अखिल भारतीय काँग्रेस ने मूलोद्योग शिक्षणास मान्यता दिल्यानंतर तत्कालीन मध्य प्रांत, संयुक्तप्रांत, बिहार, ओरिसा, आंध्रप्रदेश, पुण्याचे टिळक महाराष्ट्र विद्यापीठ येथे प्रायोगिक तत्त्वावर मूलोद्योग शिक्षणास सुरुवात झाली. पुढे १९४५ मध्ये हस्त व्यवसाय आणि ग्रामीण कलाकुसरीचे काम या माध्यमातून प्राथमिक शिक्षणापासून म्हातारपणापर्यंत निरंतर शिक्षण द्यावे हा गांधीजीचा विचार मूलोद्योग राष्ट्रीय परिषदेने स्वीकारला. पहिल्या पंचवार्षिक योजनेतही राधाकृष्ण आयोगाने राधाकृष्णन आयोगाने मूलोद्योग शिक्षणाचा पुरस्कार केला. १९५२ पर्यंत भारताच्या सर्व भागात मूलोद्योग शिक्षण पद्धती सुरू झाली. १९५६ मध्ये पदवीपूर्व आणि पदवी पातळीवर शिक्षक प्रशिक्षणामध्येही मूलोद्योग शिक्षणाचा अंतर्भाव करण्यात आला. पहिल्या तीन पंचवार्षिक योजना काळात माध्यमिक शिक्षणाची प्रगती उत्साहवर्धक होती मात्र पुढे चौथ्या, पाचव्या, सहाव्या पंचवार्षिक योजनांमध्ये या आराखड्याला ओहोटी लागली कारण त्यासाठी आर्थिक तरतूद केली गेली नाही. परंतु आजही गुजरात राज्यात प्राथमिक शिक्षण त्यापद्धतीने चालू आहे.

**वर्तमानकाळात गांधीजींच्या मुलोद्योगी शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता**

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि संघणकाच्या युगातही गांधीजींच्या मुलोद्योगी शिक्षणपद्धतीचा अवलंब केल्यास भारतासारख्या प्रचंड मनुष्यबळ असलेल्या देशात कृतीद्वारा व्यावसायिक शिक्षण , कृषिप्रधान अर्थव्यवस्थेला पूरक आजच्या काळाशी सुसंगत कुटिरोद्योग यांची जर जोड दिली तर आपल्या देशातील तरुणांना रोजगार उपलब्ध होऊन, बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल आणि अर्थव्यवस्थेला गती मिळेल. कोणताही उद्योग व्यवसाय हा आर्थिक स्वावलंबन देणारा असतो. श्रमाला प्रतिष्ठा देणारा असतो. आदिवासी बहुल भागामध्ये अल्पसंसाधानातूनही विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविणे शक्य होईल. प्रत्यक्ष जीवनशिक्षणातून विद्यार्थांचा सर्वांगीण विकास होईल आणि सर्वसमावेशक धोरण राबविल्यास संविधानिक मुल्यांवर आधारित समाज तयार होईल. जगातील फिनलंड आणि जपान या देशाची शिक्षणपद्धती म.गांधीजींच्या मुलोद्योगी शिक्षण पद्धतीशी जुळणारी आहे. त्या देशांनी केलेल्या प्रगतीमधून आपल्यास बोध घेता येईल.

**निष्कर्ष :**

मूलोद्योग पद्धतीची तत्वे, अभ्यासक्रम आणि अध्ययन, अध्यापनपद्धती तज्ञांना मान्य असूनही ती सक्रीयरित्या आमलात आली नाहीत; याचे कारण जातीवर आधारलेली भारतातील समाजव्यवस्था विशिष्ट जातीनेच कष्टाचे काम करण्याची परंपरा. हस्तकला हा मुलोध्योग शिक्षणाचा प्राण होता. प्रत्यक्ष त्याच्याकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे ती कौशल्ये मुलांमध्ये संक्रमित होऊ शकली नाहीत. म. गांधी किमान १० वर्षे जिवंत राहिले असते तर भारताचे चित्र नक्कीच बदलले असते.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. पानसे रमेश, नयी तालीम, गांधीप्रणित शिक्षणविषयक प्रयोगाचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन, पुणे २००७
२. डॉ. वाघमारे जनार्दन, लोकशाही आणि शिक्षण, पद्मगंधा प्रकाशन पुणे २०१२
३. दामले प्र.रा., गांधीदर्शन शुभदा सारस्वत प्रकाशन पुणे १९८२
४. भारवे बाळासाहेब 'ग्रामक्रांतीची दिशा' महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे २००२
५. मूलोद्योग शिक्षण, मराठी विश्वकोश प्रथमावृत्ती
६. तळोकर किशोर, म. गांधीजींचे शिक्षण विचार, अभ्युदय ब्लॉगस्पॉट, ६ सप्टेंबर २०२१
७. शर्मा सुषमा, अहिंसक क्रांतीची 'नई तालीम' सकाळ, २ ऑक्टोबर २०२०